# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 11/08/2020 (मंगळवार)

(दुपार)

---

.   दुखापत

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 4 कि. मी अंतरावर मौजा सावळी येथे दिनांक 10/08/2020 चे 18:00 वा. दरम्यान आरोपी नामे– अमोल महादेव काकडे, वय 55 वर्ष, रा. सावळी ता. कुही याने फिर्यादी नामे– ऋशीदेव महादेव काकडे, वय 55 वर्ष, रा. सावळी ता. कुही यांच्या गोठयातुन न विचारता बकरा चारण्यासाठी चऱ्याचा कुटार घेवुन गेला. फिर्यादीने त्यास विचारले कि ''माझ्या गोठयातुन मला न विचारता चऱ्याचे कुटार का घेवुन गेला.'' याकारणावरून त्यांच्यामध्ये भांडण झाले व आरोपीने फिर्यादीला हातबुक्कीने मारहाण करून डोके पकडुन विटा सिमेंटच्या भिंतीवर आपटल्याने फिर्यादी हे जखमी झाले. तसेच आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ओमकार डहारे 8766934595 हे करीत आहे.

.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर